सिकलसेल रुग्णांस व त्याच्या मदतनिसास उपचारासाठी मोफत एसटी प्रवास सवलत योजने अंतर्गत अनुसूचित जाती उपयोजने अंतर्गत (SCSP) सन २०१५-१६ करीता रु.३७,६६,७००/- अनुदान वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः सा.आ.वि.-३००११/८३३/२०१५-आ-७
जी.टी. रुग्णालय आवार, १० वा मजला,
मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.
दिनांक:- ११ जानेवारी, २०१६.

वाचा :-

१) शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांकः साआवि.३००११/१०९/२०१३-साआवि-आ-७, दि. १०/३/२०१५
२) आयुक्त (कु.क.) तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे क्र. राआसो/ सिकलसेल/एस.टी.प्रवास सवलत/५०९६९-७१/१५, दि.३१/१०/२०१५ चे पत्र.

प्रस्तावना :-

सिकलसेल ग्रस्त (SS Patern) रुग्णांना आवश्यक वैद्यकिय तपासणी व औषधोपचाराकरीता त्यांच्या निवासी गावापासून ग्रामीण रुग्णालय / उपजिल्हा रुग्णालय / जिल्हा रुग्णालय व शासकिय वैद्यकिय महाविद्यालय इ. रुग्णालयांमध्ये उपचारासाठी प्रवास करण्याकरीता एका मदतनिसासह मोफत एस. टी. प्रवास सवलत देण्याच्या योजनेस उपरोक्त शासन निर्णयान्वये प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयानुसार अनुसूचित जाती उपयोजने अंतर्गत निधी वितरीत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय:-

सिकलसेल ग्रस्त (SS Patern) रुग्णांना आवश्यक वैद्यकिय तपासणी व औषधोपचाराकरीता त्यांच्या निवासी गावापासून ग्रामीण रुग्णालय / उपजिल्हा रुग्णालय / जिल्हा रुग्णालय व शासकिय वैद्यकिय महाविद्यालय इ. रुग्णालयांमध्ये उपचारासाठी प्रवास करण्याकरीता एका मदतनिसासह

मोफत एस. टी. प्रवास सवलत देण्याकरीता अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत (SCSP) रु. ३७,६६,७००/- (रु. सदतीस लक्ष सहासष्ट हजार सातशे फक्त) वितरीत करण्यास शासन मंजूरी देत आहे.

२. शासन परीपत्रक वित्त विभाग क्र. अर्थसं -२०१५/प्र.क्र.८५/अर्थ, दि. १७.०४.२०१५ मधील परिच्छेद ७ ते १८ सोबतच्या परीशिष्टामधील अनु. क्र. ३ व अनु क्र. ९ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींची पुर्तता होत असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे. सदर प्रस्तावाशी संबंधित लेखाशिर्षाखाली ३ महिन्यापूर्वी वितरीत केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र आयुक्त (कु.क.) तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांच्या कार्यालयाने सादर केले असून. या पुर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने राज्य आरोग्य सोसायटीचे लेखा परिक्षण झालेले नसल्यामुळे लेखा परिक्षण/महालेखापाल यांचे आक्षेप उपलब्ध नाहीत. सदर प्रस्तावावरील वितरीत करण्यात येणारा निधी पुरवठादाराच्या खात्यात थेट जमा होणार आहे. सदर प्रस्तावात वस्तू खरेदी प्रस्ताव तसेच भांडवली वस्तू खरेदीचा समावेश नाही. सदर कार्यक्रमाच्या संबंधित लेखाशिर्षाखाली एक वर्ष जुने संक्षिप्त देयक प्रलंबित नाही. शासनाच्या धोरणानुसार सदर प्रस्तावावरील निधी राज्य आरोग्य सोसायटीच्या स्वतंत्र बॅक खात्यात जमा करुन खर्च करण्यात येणार आहे असे प्रमाणित करण्यात येत आहे.

३. सदर प्रस्तावावरील खर्च मागणी क्र. आर - १, २२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६ - सार्वजनिक आरोग्य, ८०० - इतर खर्च, ०१ - किमान गरजा कार्यक्रम, (०१) (४४) - सिकल सेल रुग्णास व त्याच्या मदतनिसास मोफत एस. टी. प्रवास (२२१०F४२४), ३१ - सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या मुख्य लेखा शिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा आणि सन २०१५ -१६ या वित्तीय वर्षासाठी मंजूर केलेल्या अर्थसंकल्पिय तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. सदर अनुदानासाठी प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर रकमेचे देयक त्यांनी कोषागारात सादर करुन विहित केलेल्या बाबीवर खर्च करण्यासाठी सदर रक्कम आयुक्त (कु.क.) तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांच्याकडे सुपूर्द करावी. यासाठी सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा पुणे यांना "नियंत्रक अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय, वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांकः अर्थसं-२०१५/प्र.क्र. ८५/अर्थ-३, दि. १७/४/२०१५ आणि क्र. अर्थसं-२०१५/प्र.क्र१११/अर्थ-३, दि. ३०/०६/२०१५. मधील तरतूदीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संकेतांक २०१६०१०८१७२०५८४९१७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

७. महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Manohar Sadhu Thombare

Digitally signed by Manohar Sadhu Thombare
DN: CN = Manohar Sadhu Thombare, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Under Secretary
Date: 2016.01.11 16:43:29 +05'30'

(मनोहर ठोंबरे)
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव

प्रत,

१. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१, मुंबई/महाराष्ट्र-२, नागपूर.
२. महालेखापाल, (लेखा परिक्षा), महाराष्ट्र -१, मुंबई/महाराष्ट्र-२, नागपूर.
३. आयुक्त (कु.क.) तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
४. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
५. सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, पुणे.
६. सहायक संचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, पुणे.
७. प्रशासकीय अधिकारी (आहरण व संवितरण अधिकारी), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
९. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१०.नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.वित्त विभाग (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई.
१२.गृह विभाग, मंत्रालय मुंबई.
१३. वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय मुंबई.
१४.सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई.
१५.महाव्यवस्थापक महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळ, मुंबई.
१६.सार्वजनिक आरोग्य विभाग (अर्थसंकल्प शाखा) मंत्रालय, मुंबई.
१७.सार्वजनिक आरोग्य विभाग (लेखा शाखा) मंत्रालय, मुंबई.
१८. निवड नस्ती (आरोग्य-७).